९४०८८/८२

कायम विनाअनुदान तत्वावर
(माध्यम इंग्रजी)

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 30 JUN 2010

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पुणे.

विषय: सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भ: १.शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३, दिनांक १८ ऑगष्ट २००९
२.आपले पत्र क्र.६६७/खाप्राशा/२००५-०६ दिनांक ६/५/२०१०

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४. | ५ | ६ |
| १ | सेंट मेरीज सोसा.स.नं.२४७/१४ व्ही.प्लॉट नं.१७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६. | सेंट मेरिज पब्लिक स्कूल, स.नं.२४७/१४ व्ही.प्लॉट नं.१७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १२०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने हा परवानगी संबधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तत्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

(कु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष/सचिव,
सेंट मेरीज सोसा.स.नं.२४७/१४ की प्लॉट नं.१७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६.

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
शिवाजीनगर,पुणे - ४११००५
जा.क /खाप्राशा/ ३९९ /१३-१४
दि २२/७/१३

प्रति
अध्यक्ष / सचिव ,
सेंट मेरीज सोसायटीची ,
सेंट मेरिज पब्लिक स्कूल ,
स.नं. २४७ / १४ व्ही प्लॉट नं १७ बी
डेक्कन कॉलेज रोड , येरवडा , पुणे ६ .

विषय - सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी शाळांना परवानगी देणेबाबत
सदर्भ - १ ) मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग , पुणे यांचेकडील जा. क्र. प्राशि-३ / खाप्राशा/ मा. इंग्रजी/ १४०८८/९२ दि. ३०.०६.२०१०
२) मा. शिक्षण मंडळ ठ. क्र.१३४ दि.१०.०९.२०१२

मा. शिक्षण मंडळ ठ. क्र. १३४ दि. १०.०९.२०१२ ने सेंट मेरीज सोसायटीची , सेंट मेरिज पब्लिक स्कूल या शाळेस सन २००९-१० य शैक्षणिक वर्षात इ. १ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग पुणे १ यांचे कडील दि. ३०.०६.२०१० चे पत्रातील अटींचे पालन संस्थेने करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी .

२०-५-१३
शिक्षणप्रमुख
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

प्रत -
मा. शिक्षण उपसंचालक ,
पुणे विभाग ,
पुणे - १ .

64004101

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ (३७)
दिनांक ०१/३/११

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

सेंट मेरी पब्लिक स्कूल
येरवडा, पुणे - ४११००६

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस.

प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | १ ली | अतिरिक्त २री तुकडी | जून २०१० |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्यास अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षणमंडळ कार्यालय,पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना,शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा ७२७२
दि. १०/२/११

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

सेंट मेरी पब्लिक स्कूल
येरवडा, पुणे - ४११००६

विषय- कायम विनाअनु दानित त्तवावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | १ ली | अतिरिक्त २री तुकडी | जून २०१० |
| २) | इंग्रजी | २ री | नैसर्गिक वाढ प्रथम वर्ग | जून २०१० |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा ५००
दि. २७/७/११

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
सेंट मेरी पब्लिक स्कूल,
डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे-६

विषय- कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | २ री | २ री अतिरिक्त | २०११/१२ |
| २) | —"— | ३ री, ४ थी | नैसर्गिक | २०११/१२ |

अटी व शर्ती:-

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका पुणे
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा 2430
दि. 22/8/14

मुख्याध्यापक/शाळाप्रमुख,
सेन्ट मेरी पब्लिक स्कूल
येरवडा, पुणे-६

विषय- कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि-३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | ५ वी | नैसर्गिक | २०१४/१५ |
| २) | —"— | ६ वी | —"— | २०१४/१५ |

अटी व शर्ती:-

१. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. असैसर्गिक स्पर्धा करु नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
शिवाजीनगर,पुणे - ४११००५
जा.क /खाप्राशा/3362/१६-१७
दि. 22/8/16

प्रति ,
सेंट मेरीज पब्लिक स्कूल ,
येरवडा , पुणे ६.

विषय - कायम विना अनुदान तत्वावरील शासनमान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्गाना परवानगी देणेबाबत

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस -१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि.२३/९/२००३

उपरोक्त विषया संबंधिचा तुमचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक सन |
|---|---|---|---|---|
| १. | सेंट मेरीज पब्लिक स्कूल , येरवडा , पुणे ६. | इंग्रजी | ७ वी | सन २०१५-१६ पासून |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवळी केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे .
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५ सदर मंजूर करण्यात येण-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असल्याचे निदर्शनास आल्यास तुकडी / वर्गमान्यता रदद करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९. आर. टी. ई ॲक्ट २००९ चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकारी
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१८/प्र.क्र.१९/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: १२ मार्च, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/ ६५८९/ प्रशा-ड/५१२-अ-१/३९६५, दिनांक ७/०९/२०१७
३. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/ १०३४०/ प्रशा-ड/५१२/-अ-१/४६०२, दि.१०/१०/२०१७
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र, राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/५१५/ वर्गवाढ/ड/५१२-अ-१/१२२ दि. १९/१/२०१८

शासन निर्णय:-

खाजगी प्राथमिक शाळांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अक्र. | शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | सेंट. मेरीज पब्लीक स्कुल डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | सिंड्रेला इंग्लिश स्कुल बदलापूर (प) अंबरनाथजि. ठाणे | इंग्रजी | इयत्ता ५ वी | २०१७-१८ |
| ३ | इंग्लिश मिडीयम स्कुल कडेगांव ता. कडेगांव जि. सांगली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ४ | के.यु.एन. इंग्लिश स्कुल सुभाषनगर, रोड मिरज जि. सांगली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ५ | स्कॉलर्स पब्लिक स्कुल इंदिरानगर रोड, मिरज, सांगली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ६ | शिवाजी प्राथमिक विद्यालय, सातेफळ ता. पूर्णा जि. परभणी | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ७ | आदर्श कॉन्व्हेंट, झिंगाबाई टाकळे, नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

२. वरील शाळांना सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.वा. बोरवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे ,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, ठाणे, पुणे, सांगली, परभणी, नागपूर,
७. निवडनस्ती एसएम-५.